क्रमांक : का.स./बैठक/२०४

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
वांद्रे-कुर्ला समूह, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

दिनांक : १७ नोव्हेंबर, २००३.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक ३० ऑक्टोबर, २००३ (गुरुवार) रोजी झालेल्या २०४ व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

सचिव,
कार्यकारी समिती

प्रति :

| | | |
|---|---|---|
| शासनाचे मुख्य सचिव<br>सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय,<br>मुंबई - ४०० ०३२. | - | अध्यक्ष |
| श्री.द.म.सुकथनकर<br>"प्रिया", वरळी सी फेस, वरळी,<br>मुंबई - ४०० ०१८. | - | सदस्य |
| श्री.र.य.तांबे<br>ए-६००, शिवम अपार्टमेंट्स,<br>सुरेंद्रनगर, आरपीटीएस रोड,<br>नागपूर - ४४० ०१५. | - | सदस्य |
| श्री.हरिशंकरन्<br>व्यवस्थापकीय संचालक,<br>स्कुलनेट इंडिया लिमिटेड,<br>आय.एल.अँड एफ.एस.,<br>वांद्रे-कुर्ला समुह, वांद्रे (पूर्व)<br>मुंबई - ४०० ०५१. | - | सदस्य |
| शासनाचे प्रधान सचिव<br>नगर विकास विभाग, मंत्रालय,<br>मुंबई - ४०० ०३२. | - | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| महापालिका आयुक्त<br>बृहन्मुंबई महानगरपालिका,<br>मुंबई - ४०० ००१. | - | सदस्य |
| शासनाचे प्रधान सचिव<br>गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग,<br>मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२. | - | सदस्य |
| व्यवस्थापकीय संचालक<br>सिडको, निर्मल, नरिमन पॉईंट,<br>मुंबई - ४०० ०२३. | - | सदस्य |
| महानगर आयुक्त<br>मुं.म.प्र.वि.प्राधिकरण. | - | सदस्य |

निमंत्रित :

शासनाचे सचिव
नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

शासनाचे प्रधान सचिव (उद्योग)
उद्योग, उर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

शासनाचे सचिव (पर्यावरण)
उर्जा व पर्यावरण विभाग, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रत अग्रेषित :-

विधी सल्लागार, मुं.म.प्र.वि. प्राधिकरण.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अधिकारी

*********

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या
# कार्यकारी समितीच्या २०४ व्या बैठकीचे कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| दिनांक | : | ३० ऑक्टोबर, २००३ (गुरुवार) |
| वेळ | : | दुपारी ४.०० वाजता |
| सभास्थान | : | मा.मुख्य सचिव यांचे समिती कक्ष,<br>५ वा मजला, मंत्रालय,<br>मुंबई - ४०० ०३२. |

**उपस्थित सदस्य :**

| | | |
|---|---|---|
| श्री.अजित निंबाळकर<br>शासनाचे मुख्य सचिव | - | अध्यक्ष |
| श्री.द.म.सुकथनकर | - | सदस्य |
| श्री.र.य.तांबे | - | सदस्य |
| श्री.रामानंद तिवारी<br>शासनाचे प्रधान सचिव,<br>नगर विकास विभाग | - | सदस्य |
| डॉ.सुरेश जोशी<br>शासनाचे प्रधान सचिव,<br>गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग | - | सदस्य |
| श्री.विनय मोहन लाल<br>व्यवस्थापकीय संचालक,<br>सिडको. | - | सदस्य |
| श्री.अरुण कुमार मागो<br>महानगर आयुक्त | - | सदस्य |

<u>निमंत्रित</u> :

श्री.सुभाष लाला
शासनाचे सचिव,
नगर विकास विभाग

श्री.विजयसिंग पाटणकर
अतिरिक्त महापालिका आयुक्त,
बृहन्मुंबई महानगरपालिका

श्री.के.एन.पटेल
विधी सल्लागार,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री.वि.कृ.फाटक
प्रधान प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री.सु.प्र.पेंढारकर
प्रमुख, नियोजन विभाग,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री.सुरेश परदेशी
मुख्य लेखा अधिकारी व वित्तीय सल्लागार,
सचिव, कार्यकारी समिती (अतिरिक्त कार्यभार),
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.अ.वि.देशिंगकर
मुख्य अभियंता, अभियांत्रिकी विभाग,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री.पी.आर.के.मुर्ती
प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

**बाब क्र.१ : दिनांक १ ऑगस्ट, २००३ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या मागील (२०३ व्या) बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.**

कार्यवृत्त कायम करण्यात आले.

**बाब क्र.२ : दिनांक १ ऑगस्ट, २००३ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या मागील (२०३ व्या) बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.**

कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.

**बाब क्र.३ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास दिलेल्या रु.१०० कोटी ठेवींपैकी उर्वरित ठेवीचे कर्जात रुपांतर करणेबाबत....**

३.१ मुख्य लेखाधिकारी व वित्त सल्लागार यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास सन १९९७ मध्ये रु.१०० कोटी इतकी रक्कम एक वर्षाच्या मुदतीकरीता ११% व्याजदराने (देय दर ६ महिन्यांनी) ठेवीच्या स्वरुपात दिली होती. सदर ठेवीचे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दिनांक १९.११.१९९७ रोजीच्या पत्रानुसार कर्जात रुपांतर करण्यात येणार होते. शासन निर्णयामध्ये रु.१०० कोटी इतकी रक्कम कर्जाच्या स्वरुपात ११% व्याजाच्या दराने ४ वर्षाकरीता प्राधिकरणाने द्यावी असे नमूद केले आहे असेही सांगितले. त्यांनी पुढे असे नमूद केले की, शासन निर्णयानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना रु.१०० कोटी रक्कम कर्ज म्हणून आवश्यक असल्यामुळे सदर रक्कम महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मुंबई महानगर प्रदेशातील कोणत्या प्रकल्पावर खर्च करणार आहे त्याबाबत सविस्तर माहिती प्रकल्प अहवाल पाठविण्यासाठी कळविले होते. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना वारंवार विनंती करुनही प्रकल्पाची माहिती / प्रकल्प अहवाल इ. त्यांच्याकडून प्राप्त झालेला नाही. त्यांनी ठेवीची रक्कम प्रकल्पावर खर्च केली आहे व आता ही रक्कम कर्जात समायोजन करण्याचा प्रस्ताव त्यांनी प्राधिकरणास सादर केलेला आहे. कर्जाच्या प्रस्तावामध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास याअगोदर परत केलेली रक्कम कर्ज / ठेवीपोटी समायोजन करण्यात यावी. तसेच २% दंडनीय व्याज तसेच रक्कम उशिरा अदा केल्यामुळे त्यावर व्याज

(Interest on delayed payment) आकारण्यात येऊ नये व कर्ज ९% दराने पुढील ५ वर्षांकरीता देण्यात यावे असे कळविले आहे.

३.२ त्यानंतर, मुख्य लेखाधिकारी व वित्त सल्लागार यांनी पुढे अशीही माहिती दिली की, कार्यकारी समितीने याअगोदर घेतलेल्या निर्णयानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने ठेवीची रक्कम वेळेवर अदा केलेली नसल्यामुळे ठेवीचे नुतनीकरण करण्यात आलेले नाही व २% दंडनीय व्याज आकारण्यात आले आहे. तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने रक्कमा देय तारखेस अदा न केल्यामुळे विलंब व्याजही आकारण्यात आले आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने याअगोदर परत केलेली रक्कम लेख्याच्या पध्दतीनुसार प्रथम ठेवीवरील प्रलंबित व्याजापोटी बाब टिप्पणीतील परिशिष्ट-२ मध्ये दर्शविल्याप्रमाणे समायोजित करण्यात आली आहे, अन्यथा यावर महालेखाकार यांचे आक्षेप येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

३.३ व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांनी असे सांगितले की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणानेही ठेवीची रक्कम सिडकोप्रमाणे मुंबई महानगर प्रदेशात मुलभूत नागरी सुविधांवर खर्च केली आहे. मुंबई महानगर प्रदेशाच्या विकासाची जबाबदारी प्राधिकरणाची आहे. अशा ठेवींबाबत सहानुभूतीचा दृष्टीकोन प्राधिकरणाने ठेवला पाहिजे व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने परत केलेली रक्कम ठेवीपोटी (व्याजापोटी समायोजित न करता) जमा करुन घेतली पाहिजे. प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी केलेली विनंती मान्य करावी असे सुचविले.

३.४ श्री.सुकथनकर, सदस्य यांनी असे सांगितले की, बाब टिप्पणीच्या परिशिष्ट-१ मध्ये समाविष्ट केलेले महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे प्रकल्प हे मुंबई महानगर प्रदेश विकास क्षेत्रातील आहेत. त्याचप्रमाणे शासनाच्या इतर संस्थांही उदा. एमएसआरडीसी, सिडको, मुंबई महानगर प्रदेशामध्ये पायाभूत सुविधा पुरविण्याचीही कामे करीत असतात, त्यामुळे प्राधिकरणाचीही कामे करणा-या संस्थांना त्याप्रमाणे स्थानिक संस्थांनाही निधी उपलब्ध करुन देताना काही प्रमाणात सवलत देण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे.

३.५ त्यानंतर, महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, प्राधिकरणाने विविध संस्थांना ठेव म्हणून दिलेल्या रकमा वेळेवर परत न आल्यामुळे कार्यकारी समितीच्या निर्णयानुसार २% अतिरिक्त व्याज आकारण्यात आलेले आहे. वित्तीय नियमानुसार देय रक्कमा देण्यास विलंब झाल्यास त्या कालावधीसाठी विलंब व्याज (Interest on delayed payment) आकारण्यात येते. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण या एका संस्थेस दंडनीय / विलंब व्याजामधून सूट दिल्यास प्राधिकरणाने ज्या इतर शासकीय संस्थांना ठेवी दिलेल्या आहेत त्या संस्थांनासुध्दा ही सवलत द्यावी लागेल. प्राधिकरण मुंबई महानगर प्रदेशामधील स्थानिक संस्थांना पायाभूत नागरी सुविधांच्या कामाकरीता कर्ज देताना व्याजाच्या दराबाबत निश्चितच सौम्य दृष्टीकोन ठेवीत असते.

३.६ महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, दंडनीय व्याज / विलंब व्याज न आकारण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यापूर्वी प्राधिकरणास याबाबत किती आर्थिक तोटा सहन करावा लागेल यावरही विचार होणे आवश्यक आहे. याबाबत सर्व बाजूने विचार करुन प्राधिकरणाकडून विविध संस्थांना देण्यात येणा-या कर्जाबाबत / ठेवीबाबत सविस्तर टिप्पणी तयार करुन पुढील बैठकीत सादर करण्यात येईल. सदर प्रस्तावास मा. अध्यक्षांनी सहमती दर्शविली.

३.७ चर्चेनंतर, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा आलेला प्रस्ताव तात्पुरता प्रलंबित ठेवण्यात यावा असा निर्णय घेण्यात आला.

**<u>बाब क्र.४ :</u>** **<u>भारत:मुं.ना.प.प्र. सीआर ३६६२ आयएन/एलएन-४६६५ आयएन. मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत मौजे घाटकोपर गाव, घाटकोपर (पूर्व), मुंबई (A-5) येथे प्रकल्पग्रस्तांसाठी कायमस्वरुपी सदनिकांचे बांधकाम करणे.</u>**

४.१ महानगर आयुक्त यांनी असे स्पष्ट केले की, कुर्ला-ठाणे दरम्यानच्या पाचव्या व सहाव्या रेल्वे मार्गीकेच्या (Fifth & Sixth Corridor) कामामुळे विस्थापित होणा-या कुटुंबांच्या पुनर्वसनासाठी घाटकोपर येथे, महाराष्ट्र शासनाकडून ताब्यात घेतलेल्या भूखंडावर, एकूण ३१४ सदनिका / दुकाने बांधावयाची आहेत. त्यासाठी जागतिक बँकेच्या मार्गदर्शक पध्दतीनुसार वृत्तपत्रात दिनांक २० व २१ जुलै, २००३ रोजी प्रसिध्दी देऊन सार्वजनिकरित्या निविदा मागविण्यात

आल्या होत्या. त्यास प्रतिसाद म्हणून प्राप्त झालेल्या ६ निविदांपैकी मे.गोलानी ब्रदर्स यांची रु.११,११,११,१११/- किंमतीची निविदा विनाअट व सर्वात लघुत्तम आहे. त्यास मान्यता मिळावी असेही विदित करण्यात आले.

४.२ मुख्य अभियंता यांनी असे सादर केले की; हे बांधकाम प्रचलित पध्दतीने (Conventional System) करण्याचे प्रस्तावित आहे. कारण की, दुस-या पध्दतीचे बांधकाम, जसे की, MIVAN पध्दतीचे बांधकाम Slab wall system ने करण्यासाठी परदेशातून ॲल्यूमिनियमचे साचे आयात करावे लागतात व ते जास्त खर्चीक असतात. त्यामुळे पुरेशा प्रमाणात साचे उपलब्ध होत नाहीत. परिणामी कामाच्या प्रगतीत खिळ बसण्याची शक्यता आहे. त्यांनी पुढे असेही सादर केले की, पर्यायी पध्दतीमध्ये भिंती या भारवाहक (Load bearing) असतात व वापरातील क्षेत्रफळात अंतर्गत फेरफार केल्यास वा नवीन खिडकी, दरवाजा आदींसाठी भिंतीची तोडफोड केल्यास, पूर्ण इमारतीस धोका संभवतो. प्रस्तावित बांधकामे अल्प उत्पन्न गटातील झोपडपट्टीधारकांच्या पुनर्वसनासाठी करावयाची आहेत हे विचारात घेऊन, प्रचलित पध्दतीचा वापर करण्याचा निर्णय घेण्यात आला.

४.३ श्री.सुकथनकर, सदस्य यांनी या बाब टिप्पणीतील बांधकामाच्या चौरस फुटाचा दर व बाब टिप्पणी क्र.५ मधील बांधकामाच्या दरात तफावतीच्या कारणाबाबत विचारणा केली असता, मुख्य अभियंता यांनी पुढे असे सांगितले की, घाटकोपर येथील बांधकामाच्या पायाची उपलब्धता सुमारे ६.४८ मीटर खोलीवर आहे व त्यामुळे 'पाईल' पध्दतीचा पाया (Foundation) प्रस्तावित आहे. याउलट हरियाली गांव, कांजूरमार्ग येथील पाया खुल्या पध्दतीचा असून, त्याचे बांधकाम कमी खोलीवर करावयाचे आहे. त्यामुळे प्रति चौरस फूट क्षेत्रफळाच्या बांधकामाच्या दरामध्ये (घाटकोपर रु.८९३/- प्रती चौरसफूट, हरियाली गांव रु.८३७/- प्रती चौरसफूट) थोडाफार फरक दिसतो.

४.४ चर्चेअंती प्रस्ताव मंजूर करण्यात आला तसेच सभेच्या कार्यवृत्ताच्या मंजूरीच्या प्रतिक्षेशिवाय निविदेनुसार आवश्यक असणा-या कागदपत्रांची पूर्तता करणे आणि जागतिक बँकेच्या मार्गदर्शक तत्वानुसार कार्यवाही करण्यास संमती देण्यात आली.

४.५ चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला:-

ठराव क्र.८८६ :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, अधिनियम, १९७४ चे कलम ७ चे पोटकलम (३)(iii) आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती, मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत बाधीत होणा-या प्रकल्पग्रस्तांसाठी मौजे घाटकोपर, प्रादेशिक परिवहन कार्यालयासमोर, घाटकोपर, मुंबई येथे करण्यात येणा-या पक्क्या सदनिकांच्या बांधकामाची, निविदाकार मे.गोलानी ब्रदर्स यांची रु.११,११,११,१११/- इतक्या सर्वात कमी किंमतीची निविदा स्विकारण्यास, करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह मंजूरी देण्यात येत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** सभेच्या कार्यवृत्ताच्या मंजूरीच्या प्रतिक्षेशिवाय निविदेनुसार आवश्यक असणा-या कागदपत्रांची पूर्तता करणे आणि जागतिक बँकेच्या मार्गदर्शक तत्वानुसार कार्यवाही करणे आदींसाठी महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

बाब क्र.५ : **भारत:मुं.ना.प.प्र. सीआर ३६६२ आयएन/एलएन-४६६५ आयएन. मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत मौजे हरियाली गाव, कांजूरमार्ग, मुंबई (A-4) येथे प्रकल्पग्रस्तांसाठी कायमस्वरुपी सदनिकांचे बांधकाम करणे.**

५.१ महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, कुर्ला-ठाणे दरम्यानच्या पाचव्या व सहाव्या रेल्वे मार्गीकेच्या कामामुळे विस्थापित होणा-या कुटुंबांच्या पुनर्वसनासाठी हरियाली गांव, कांजूरमार्ग येथे एकूण १६४८ पक्क्या सदनिका / दुकाने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या धोरणानुसार बांधावयाच्या आहेत. त्यासाठी जागतिक बँकेच्या मार्गदर्शक पध्दतीनुसार वृत्तपत्रात दिनांक २० व २१ जुलै, २००३ रोजी प्रसिध्दी देऊन सार्वजनिकरित्या निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यास प्रतिसाद म्हणून प्राप्त झालेल्या ४ निविदांपैकी मे.युनिटी इंफ्रा प्रोजेक्टस् लि. यांची रु.४१,९७,००,०००/- किंमतीची निविदा विनाअट व सर्वात लघुत्तम आहे.

५.२ मुख्य अभियंता यांनी असे सांगितले की, हे बांधकामही प्रचलित पध्दतीने (Conventional System) करण्याचे प्रस्तावित आहे. निविदाकार निविदेतील अन्य सर्व अटींचे अनुपालन करीत असल्याने तसेच जागतिक बँकेने सदर प्रस्तावास दिनांक १३.१०.२००३ रोजी "ना हरकत प्रमाणपत्र" दिल्यामुळे मान्यता मिळावी अशी विनंती केली.

५.३ चर्चेअंती प्रस्ताव मंजूर करण्यात आला तसेच सभेच्या कार्यवृत्तांच्या मंजूरीच्या प्रतिक्षेशिवाय निविदेनुसार आवश्यक असणा-या कागदपत्रांची पूर्तता करणे आणि जागतिक बँकेच्या मार्गदर्शक तत्वानुसार कार्यवाही करण्याची संमती देण्यात आली.

५.४ चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.८८७</u> :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ७ चे पोटकलम (३)(iii) आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती, मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत बाधीत झालेल्या व होणा-या प्रकल्पग्रस्तांसाठी मौजे हरियाली, कांजूरमार्ग, मुंबई येथे करण्यात येणारे खुल्या पध्दतीच्या पाया बांधकामाचा पर्याय असलेले पक्क्या सदनिकांच्या बांधकामाची, निविदाकार मे.युनिटी इंफ्रा प्रोजेक्टस् लि. यांची रु.४१,९७,००,०००/- इतक्या सर्वात कमी किंमतीची निविदा स्विकारण्यास करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह मंजूरी देण्यात येत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** सभेच्या कार्यवृत्ताच्या मंजूरीच्या प्रतिक्षेशिवाय निविदेनुसार आवश्यक असणा-या कागदपत्रांची पूर्तता करणे आणि जागतिक बँकेच्या मार्गदर्शक तत्वानुसार कार्यवाही करणे इत्यादींसाठी महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

## बाब क्र.६ : उड्डाणपुलांच्या खालील जागेचा वाणिज्यिक विकास – Commercial Development of space below flyovers

६.१ मे.कन्सल्टींग इंजिनिअरिंग सर्व्हिसेस सल्लागाराचे गट प्रमुख प्रा.रंगनाथन् यांनी सदर विषयाच्या अभ्यासाच्या आवश्यकतेची पार्श्वभूमी, व्याप्ती तसेच हाती घेतलेली विविध सर्वेक्षणे, अभ्यासाच्या आकडेवारींचे संकलन, उड्डाणपुलांच्या खालील जागेचा वाणिज्यिक वापरासंबंधी व शिफारशींचे सविस्तर सादरीकरण केले. मुख्य सचिवांनी असे मत व्यक्त केले की, एका विशिष्ट ठिकाणाची वाणिज्यिक वापरासाठी जागेची मागणी भागविण्यासाठी उड्डाण पुलांखालील जागेचा वापर करण्यात यावा, काही ठिकाणी फक्त शुल्क भरा आणि वाहन थांबवा यासारख्या योजना राबविणे शक्य होईल. श्री.सुकथनकर, सदस्य यांनी असे मत व्यक्त केले की, एखाद्या उड्डाण पुलाखालील जागेचा विशिष्ट उपयोगासाठी विचार करताना मार्गदर्शक तत्वे ठरविण्यात यावीत उदा.पूलाखाली आवश्यक असलेली रस्त्यांची कमीत कमी रुंदी पूलाखालच्या रस्त्यावरील वाहतूकीचे प्रमाण इत्यादी. त्यानंतर, श्री.तांबे, सदस्य यांनी सूचविले की, जगातील अन्य शहरामधील यासंबंधीचा अनुभवही विचारात घेणेही आवश्यक आहे.

६.२ सल्लागारांनी असे प्रतिपादन केले की, अभ्यास कार्यात आणि त्या संबंधीच्या विश्लेषणात वरील सर्व मुद्दयांचा विचार करण्यात आला आहे. विशिष्ट वाणिज्यिक वापराची परवानगी देण्यासाठी तयार केलेल्या मार्गदर्शक तत्वांमध्ये या सर्व बाबी समाविष्ट करण्यात आलेल्या आहेत.

सविस्तर चर्चेनंतर खालील उल्लेखित निर्णय घेण्यात आले :-

(१) उड्डाणपूलाखालच्या जागेच्या वापरासाठी अनुज्ञेय असलेल्या विविध वापराची यादी सल्लागारांनी तयार करावी.

(२) उड्डाणपूलाखाली कोणत्या सार्वजनिक सुविधांचा विचार करण्यात येईल. याबाबत सल्लागारांनी स्पष्ट माहिती पुरवावी.

(३) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ आणि बृहन्मुंबई महानगरपालिका तसेच वाहतुक पोलीस विभाग यांचे यासंबंधातील लेखी अभिप्राय घेण्यात यावेत.

(४) उपरोक्त उल्लेखित बाबींची पूर्तता करुन कार्यकारी समितीच्या आगामी बैठकीत बाब टिप्पणी पुन्हा सादर करावी.

६.३ चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव लांबणीवर टाकण्यात आला.

**बाब क्र.७ : संक्रमण शिबिर वडाळा येथे ३६०० संक्रमण सदनिका व मानखुर्द-तुर्भे मंडाले येथे २५०० सदनिकांना स्वतंत्र विद्युत मिटर बसविण्याबाबत.**

७.१ प्रस्तावित बाबींच्या संदर्भात अधिक तपशिल विषद करताना महानगर आयुक्त यांनी असे स्पष्ट केले की, वडाळा कोकरी आगार तसेच मानखुर्द आणि तुर्भे मंडाले येथील प्रत्येक संक्रमण सदनिकेसाठी स्वतंत्र विद्युत मीटर बसविण्याचा प्रस्ताव तयार करुन त्यास मुख्य अभियंता (विद्युत) सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडून तांत्रिक मंजूरी प्राप्त करण्यात आली. दिनांक ९ व १० मे, २००३ रोजी वृत्तपत्रात प्रसिध्दी देऊन सार्वजनिकरित्या निविदा मागविण्यात आल्या होत्या. प्रात झालेल्या एकूण निविदांपैकी खालील निविदाकारांच्या विनाअट व सर्वात लघुत्तम निविदा त्यासमोर दर्शविलेल्या कामासाठी मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे :-

| अ.क्र. | कामाचे नांव | ठेकेदाराचे नांव |
|---|---|---|
| १. | वडाळा कोकरी आगार संक्रमण शिबिर येथील ३६०० सदनिकांसाठी स्वतंत्र विद्युत मीटर बसविण्यासाठी आवश्यक असणारी विद्युत वाहिनी टाकणे व विद्युत मीटरसाठी खोल्या बांधणे इत्यादी. | मे.निखिल इलेक्ट्रोमेकॅनिकल्स, ठाणे लघुत्तम देकार रु.८६,५५,६२८.२० |
| २. | मानखुर्द, तुर्भे मंडाले संक्रमण शिबिर येथील २५०० सदनिकांसाठी स्वतंत्र विद्युत मीटर बसविण्यासाठी आवश्यक असणारी विद्युत वाहिनी टाकणे व विद्युत मीटरसाठी खोल्या बांधणे इत्यादी. | मे.कुसूम एन्टरप्रायझेस, नवी मुंबई लघुत्तम देकार रु.९१,५०,८१७.६८ |

७.२ महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, त्याचप्रमाणे मध्यम दाबाची विद्युत वाहिनी टाकण्याकरीता बी.एस.ई.एस. कंपनीस रु.२०,९५,८९१/- इतकी रक्कम भरावी लागणार आहे. असा एकूण खर्च रु.१,९९,०२,३३६.८८ एवढा अपेक्षित आहे. त्यास कृपया मंजूरी मिळावी. चर्चेअंती प्रस्ताव मंजूर करण्यात आला तसेच सभेच्या कार्यवृत्ताच्या मंजूरीच्या प्रतिक्षेशिवाय निविदेनुसार आवश्यक असणा-या कागदपत्रांची पूर्तता करणे आणि जागतिक बँकेच्या मार्गदर्शक तत्वानुसार कार्यवाही करण्याची संमती देण्यात आली.

७.३ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. ८८८ :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ७ चे पोटकलम (३)(ii) व (iii) आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन प्रस्तावित नवीन स्वतंत्र विद्युत मीटर्स बसविण्यासाठी वडाळा येथील कामाकरीता मे.निखिल इलेक्ट्रोमेकॅनिकल, ठाणे यांची लघुत्तम निविदा व मानखुर्द-तुर्भे मंडाले संक्रमण शिबिर येथील कामाकरीता मे.कुसूम एन्टरप्रायझेस यांची लघुत्तम निविदा मान्य करण्यास आणि दोन्ही कामासाठी व मध्यम दाबाची विद्युत वाहिनी टाकण्याकरीता एकूण खर्च रु.१,९९,०२,३३६.८८ करीता मान्यता देण्यात येत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** सदर ठरावाबाबत योग्य ती कार्यवाही करण्याकरीता महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.८ : वडाळा भारवाहक तळ येथे बांधलेल्या सुलभ टाईप शौचालयाचे "पैसे भरा व वापरा" या तत्वावर परिचालन व परिरक्षण करण्यासाठी संस्थेची नेमणूक करणे.**

८.१ महानगर आयुक्त यांनी बाब टिप्पणीबाबत थोडक्यात माहिती दिली. महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, प्राधिकरणाने वडाळा भारवाहक तळ येथे बांधलेल्या सुलभ शौचालयाचे "पैसे भरा व वापरा" या तत्वावर परिचालन व परिरक्षण करणेसाठी वर्तमानपत्रामध्ये दिनांक १५.९.२००३ रोजी जाहिरात दिली होती. या जाहिरातीस अनुलक्षून प्रतिसाद म्हणून ६ निविदा प्राप्त झाल्या आहेत. प्राप्त झालेल्या निविदांमध्ये मे.आश्रय कृषि सेवा प्रतिष्ठान यांची निविदा सर्वात जास्त म्हणजे रु.१२,०५०/- दरमहा अशी आहे. त्यामुळे सदर संस्थेचा देकार मान्य करण्यास हरकत नाही. मे.आश्रय कृषि सेवा प्रतिष्ठान यांनी जर देकार न स्विकारल्यास त्यांनी निविदेसोबत भरलेली रु.१०,०००/- ची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल व त्या खालोखाल असलेली श्री.राभडिया सेवक संघ यांची रु.८०००/- किंमतीची वैध निविदा स्विकारण्यात यावी असे सांगितले.

८.२ चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. ८८९ :

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ७ चे पोटकलम (३)(iii) आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती, याद्वारे मे.आश्रय कृषि सेवा प्रतिष्ठान यांनी वडाळा भारवाहक तळ येथील सुलभ टाईप शौचालयाचे "पैसे भरा व वापरा" या तत्वावर परिचालन व परिरक्षण करण्यासाठी त्यांच्या निविदेमध्ये नमूद केलेल्या रु.१२,०५०/- चा सर्वोच्च किंमतीच्या देकारास मान्यता देण्यात येत आहे व याबाबतचे कंत्राट मे.आश्रय कृषि सेवा प्रतिष्ठान यांना तीन वर्षासाठी देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** मे. आश्रय कृषि सेवा प्रतिष्ठान यांनी देकार न स्विकारल्यास त्यांनी निविदेसोबत भरलेली रु.१०,०००/- ची अनामत रक्कम जप्त करुन त्या खालोखाल असलेली श्री.राभडिया सेवक संघ यांची रु.८०००/- ची वैध निविदा स्विकारण्यात यावी व याबाबतचे कंत्राट त्यांना ३ वर्षासाठी देण्यात यावे.

**"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** उच्चतम किंमत देऊ केलेल्या निविदाकारांनी त्यांना दिलेला निविदा स्विकृतीचा देकार स्विकारल्यानंतर व त्यापुढे तीन महिने समाधानकारक सेवा दिल्यानंतर त्या खालोखाल निविदाकाराची अनामत रक्कम प्रत्येकी रु.१०,०००/- त्यांना परत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**"आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की,** ठराव क्र.८५७ मध्ये अंशतः बदल करुन मे.कवल सेवा संस्था यांनी त्यांच्या निविदेमध्ये नमूद केलेली रु.१५,०२०/- या सर्वोच्च किंमती ऐवजी त्यांचेकडून दिनांक १.५.२००३ पासून नवीन एजन्सी नियुक्तीच्या दिनांकापर्यंत दरमहा रु.१०००/- प्रमाणे भाडे वसूल करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**"पुढे असा ठराव करण्यात येत आहे की,** ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठी महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.९ : दिनांक ३० जुन, २००३ रोजी संपणा-या त्रैमासिक कालावधीचे लेखे**

महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाच्या त्रैमासिक कालावधीच्या लेख्यांची माहिती दिली. सदर बाबीवर चर्चा होऊन कार्यकारी समितीने प्राधिकरणाच्या जून, २००३ पर्यंतच्या त्रैमासिक कालावधीच्या लेख्याची नोंद घेतली.

**बाब क्र.१० : महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाकडील प्राधिकरणाच्या ठेवी, कर्जरोख्यांच्या स्वरुपात परत करण्याबाबतचा महामंडळाचा प्रस्ताव.**

१०.१ मुख्य लेखाधिकारी व वित्त सल्लागार यांनी असे सांगितले की, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळास शासन निर्णयानुसार रु.२०० कोटी ठेव सप्टेंबर, १९९८ मध्ये एक महिन्याच्या कालावधीसाठी १०% व्याजाच्या दराने दिली होती. सदर ठेवीपैकी महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाने रु.२० कोटी रक्कम परत केलेली आहे. प्राधिकरणाने वारंवार विनंती करुनही महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाने प्राधिकरणाच्या ठेवीची रक्कम परत केलेली नाही. सदर ठेवीस शासन निर्णयानुसार हमीही देण्यात आलेली नाही. महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ प्राधिकरणास ठेवीवर व्याजही देत नाही. सप्टेंबर, २००३ अखेर महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाकडील एकूण प्रलंबित व्याज रु.८०.४३ कोटी इतके झाले आहे.

१०.२ मुख्य लेखाधिकारी व वित्त सल्लागार यांनी पुढे असे सादर केले की, प्राधिकरणास सदर ठेवीवर व्याजही मिळत नसल्यामुळे प्राधिकरणातील विभाग प्रमुखांच्या आढावा बैठकीमध्ये महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ ठेवीची रक्कम परत देत नाहीत तसेच व्याजही देत नसल्यामुळे महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळास प्राधिकरणाच्या ठेवी व प्रलंबित व्याजापोटी कर्जरोखे देण्याबाबत विचारणा करण्यात यावी असे महानगर आयुक्त यांनी निदेश दिले होते. त्याप्रमाणे महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळामधील संबंधित अधिकारी यांच्याबरोबर चर्चा करण्यात आली होती. महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाने प्राधिकरणाच्या ठेवी व त्यावरील प्रलंबित व्याजापोटी आगामी कर्जरोखे प्राधिकरणाच्या नावाने देण्याचे प्रस्तावित केले आहे. त्यामुळे प्राधिकरणास दरवर्षी कमीत-कमी व्याज मिळू शकेल. कर्जरोख्याचा कालावधी संपल्यानंतर प्राधिकरणाची ठेव व त्यावरील

आजतागायत प्रलंबित असलेले व्याज परत मिळू शकेल. मुख्य लेखाधिकारी व वित्त सल्लागार यांनी पुढे असेही सांगितले की, शासन निर्णय दिनांक ६.८.२००२ नुसार प्राधिकरण कर्ज रोख्यामध्ये अतिरिक्त निधीची गुंतवणूक करु शकत नाही. तसेच राष्ट्रीयकृत बँकेतच प्राधिकरण एका वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी निधीची गुंतवणूक करु शकते. त्यामुळे सदर प्रस्तावास शासनाच्या मान्यतेची आवश्यकता आहे.

१०.३ सदर बाबीवर सखोल चर्चा झाल्यानंतर प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र. ८९०</u> :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने शासन निर्णय १४.९.१९९८ नुसार रु.२०० कोटी इतकी ठेव एक महिन्यासाठी १०% व्याजाच्या दराने महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ यांना दिली होती. प्राधिकरणाने वारंवार विनंती करुनही प्राधिकरणाच्या ठेवीची रक्कम परत करण्यात आलेली नाही. त्यावर व्याजही अदा करण्यात आलेले नाही. तसेच सदर ठेवीस शासन निर्णयानुसार शासन हमीही देण्यात आलेली नाही. त्यामुळे सदर ठेवीचे / प्रलंबित व्याजाचे महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ यांच्या प्रस्तावित कर्ज रोख्यामध्ये रुपांतर करण्यास शासनाच्या मान्यतेच्या अधीन राहून करण्यात यावे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** ज्या तारखेस महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास कर्जरोख्याचे वाटप करेल तोपर्यंत देय होणारे व्याज / दंडनीय व्याज इत्यादीच्या रकमेचा समावेश कर्ज रोख्यामध्ये करण्यात यावा. तसेच कर्ज रोख्यांच्या व्याजाचा दर खुल्या बाजारातील व्याजाचा दर व सध्या अस्तित्वात असलेल्या व्याजाच्या दरावर अवलंबुन असेल.

"**आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** सदर ठरावाची अंमलबजावणी व पुढील योग्य ती कार्यवाही करण्याकरीता महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.११ :** **प्राधिकरणाकडे असलेला अतिरिक्त निधीचा गुंतवणूक अहवाल दिनांक १६ जुलै, २००३ ते दिनांक ३० सप्टेंबर, २००३**

प्राधिकरणाकडील दिनांक १६ जुलै, २००३ ते दिनांक ३० सप्टेंबर, २००३ पर्यंतच्या असलेल्या अतिरिक्त निधीच्या गुंतवणूक अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**पटल बाब :** **मुंबई नागरी परिवहन प्रकल्पाअंतर्गत प्रकल्पग्रस्तांकरीता बांधण्यात येणा-या कायमस्वरुपी निवासी गाळयांचे बांधकाम - बाहय पायाभूत सुविधांच्या अंदाजित खर्चास मंजूरी मिळणेबाबत –**

महानगर आयुक्त यांनी बाब टिप्पणीबाबत माहिती देताना मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत कायमस्वरुपी बांधण्यात येणा-या विविध ठिकाणी रस्ते, पाणीपुरवठा, मलनिःसारण इ. बाहय पायाभूत सुविधा निर्माण करण्याची जबाबदारी बृहन्मुंबई महानगरपालिकेची आहे. परंतु महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेबरोबर झालेल्या चर्चेनुसार सदर कामे प्राधिकरणाने करावीत अशी विनंती करण्यात आलेली आहे. सदर कामे तातडीने करणे आवश्यक आहे. तसेच सदर कामावर प्राधिकरण कोणताही खर्च करणार नाही. त्यामुळे प्रस्तावित रु.२०.९५ कोटीची कामे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्यावतीने प्राधिकरणाकडून करण्याच्या प्रस्तावास मंजूरी मिळावी.

चर्चेअंती, प्रस्ताव मंजूर करण्यात आला तसेच सभेच्या कार्यवृत्तांच्या मंजूरीच्या प्रतिक्षेशिवाय आवश्यक असणा-या कागदपत्राची पूर्तता करणे व पुढील कार्यवाही करण्याची संमती देण्यात आली.

त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला:-

ठराव क्र. ८९१ :

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ७ चे पोटकलम ३(ii) आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती, मुंबई नागरी परिवहन प्रकल्पाची अंमलबजावणी

करण्यासाठी आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधा उदा.रस्ते बांधणे, पाणीपुरवठा, मलनिःसारण इ. आवश्यक बाबी बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे करण्यात येणारा खर्च रु.२०.९५ कोटी उपविकासकांकडून झोपडपट्टी पुनर्विकास नियमाप्रमाणे उपलब्ध होणा-या निधीतून करण्यात यावा. प्राधिकरणाने याकरीता आपल्या निधीतून खर्च करु नये.

**"असाही असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ७ चे पोटकलम ३(ii) व कलम ५ नुसार, कार्यकारी समिती, याद्वारे महानगर आयुक्त यांना मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांच्या अंतर्गत पुनर्वसन प्रकल्पांना लागणा-या पायाभूत सुविधांची कामे प्रचलित नियमानुसार हाती घेण्यास व त्यावर वेळोवेळी होणा-या खर्चाला मान्यता देण्यासाठी प्राधिकृत करीत आहे."

वेळेअभावी, कार्यकारी समितीची विशेष बैठक लांबणीवर टाकण्यात आली.

त्यानंतर, मा. अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त करण्यात आले.

——— 0000000000 ———